क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/४५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक १४ ऑक्टोबर, १९८७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ सप्टेंबर, १९८७ रोजी झालेल्या ४५व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
१०/१०/८७.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/45.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 14th October, 1987.

The minutes of the 45th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 4th September, 1987 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

(S. V. ASGAONKAR)
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

-----------

ukd:

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# ४५व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ४ सप्टेंबर, १९८७ [शुक्रवार]
वेळ : दुपारी २-०० वाजता
स्थळ : समिती कक्ष [४था मजला]
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पूर्व],
मुंबई - ४०० ०५१.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रमण्यन्, नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत, नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया, नगर सेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल, नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्या |
| श्री. भगवंतराव अ. पाटील, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू, विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. दिनेश कुमार जैन, शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | -- | सदस्य |
| श्री. के. नलिनाक्षन, व्यवस्थापकीय संचालक, सिडको | -- | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर, महानगर आयुक्त | -- | सदस्य-सचिव |

**बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [४४व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे**

वरील बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या दिनांक २३ मार्च, १९८७ व दिनांक २७ एप्रिल, १९८७ रोजी प्राधिकरणाच्या झालेल्या अनुक्रमे ४३व्या व ४४व्या बैठकींच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही**

वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील भू-खंड क्र. सी-११ हा महाराष्ट्र

राज्य विद्युत मंडळाला देऊ करून त्यांचे अधिमूल्य तीन हप्त्यामध्ये देण्याची त्यांना सवलत दिली होती. परंतू ही सवलत देऊनसुध्दा त्यांनी आतापावेतो सदर भूखंड विकत घेण्यास संमती दर्शविली नाही याची प्राधिकरणाने दखल घेतली. म. रा. वि. मं. आणि मुं. म. प्र. वि. प्राधिकरण यांच्या संबंधित अधिका-यांशी लवकरच बैठक बोलावून त्यात या विषयाची चर्चा करून यासंबंधी निर्णय घेण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगितले.

बाब क्र. ३ : मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम १९७४ च्या कलम १३ अन्वये अधिसूचना-अधिसूचनेला काही दुरुस्त्या व ती वाढीव काळासाठी अंमलात ठेवणे

या बाबीवरील चर्चेमध्ये खालील मुद्दे मांडण्यात आले :-

१. मुंबई बेट शहरातील पुन:र्बांधणी केलेल्या इमारतीमध्ये विद्यमान कार्यालयाला तेवढेच किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्र देण्याच्या प्रस्तावावर विचार करतांना बेट शहरातील विद्यमान कार्यालयाच्या अभिप्रमाणित आधारसामग्रीच्या अभावी तसेच त्यांचे निश्चित क्षेत्र व स्थान यांच्या अभावी हा प्रस्ताव कार्यान्वित करणे अत्यंत कठीण होणार आहे असे प्राधिकरणास वाटले. या बाबतीत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाकडे योग्य तो निर्देश पाठविण्याचे ठरविण्यात आले.

बेट शहरामध्ये एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी होणा-या कार्यालयीन व निवासी वापराच्या आंतर बदलास परवानगी देण्याच्या प्रस्तावाच्या संबंधात प्राधिकरणाला असे वाटले की, या उपाययोजनेमुळे बेट शहरात जादा कार्यालयीन जागा उपलब्ध होईल. कारण कार्यालयीन जागा व्यापणारे एखादे विशिष्ट कार्यालय तेथून दुस-या जागी गेले तरी विद्यमान कार्यालयीन जागा ही कार्यालयीन जागा म्हणूनच वापरात येण्याची जादा शक्यता आहे.

२. टिप्पणी सोबतच्या जोडपत्र-एकच्या परिच्छेद १ च्या संदर्भात, म्हणजेच जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर इमारतींच्या मालकांनी/रहिवाश्यांनी बांधलेल्या नवीन इमारतींमध्ये भाडेकरूंना जागा देण्याविषयी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांच्या दिनांक १ डिसेंबर, १९८४ च्या पत्राच्या संदर्भात असे सुचविण्यात आले की, जुन्या इमारतींमध्ये भाडेकरूंच्या ताब्यात असलेल्या चटई क्षेत्राएवढी जागा न देता त्यांना बांधीव क्षेत्राएवढी जागा देण्यात यावी. ही सूचना राज्य शासनाच्या विचारार्थ पाठविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर प्राधिकरणाने टिप्पणीचे जोडपत्रतीन म्हणून जोडलेल्या मसूदा

... ३/-

अधिसूचनेवर विचार करून मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केला :-

ठराव क्र. ३४७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येतो की, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ च्या पोट कलम[१] अन्वये दिलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून व या बाबतीत संमत केलेल्या पूर्वीच्या आदेशात अंशत: फेरबदल करून हे प्राधिकरण प्रस्तावित केल्याप्रमाणे टिप्पणीला जोडलेली मसूदा अधिसूचना [जोडपत्र-तीन] काढण्यास मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, सदर अधिनियमांच्या कलम ७ए अन्वये दिलेल्या शक्तींचा वापर करून उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात आपल्या सहीने अधिप्रमाणित करून प्रकाशित करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ४ : बीबीआर/बॅक-बे रेक्लमेशनच्या तीन ते सहा क्रमांकाच्या ब्लॉक्समधील क्षेत्राकरिता प्रारुप विकास आराखडा - त्याची प्रसिध्दी

ही बाब सादर करतांना, महानगर आयुक्त यांनी बैठकीमध्ये असे सांगितले की, बॅक-बे भागामध्ये अनधिकृत पुन:प्रापणाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने आणि गाळ भरणाच्या प्रक्रियेला आळा बसावा या दृष्टीने मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने "बॅक-बे सौंदर्य योजना" म्हणून ओळखली जाणारी जलाग्र विकासाचा प्राधिकरणाने मसूदा प्रस्ताव तयार करून ते प्रकाशित केले होते. नेहमीची कार्यपध्दती अनुसरून ते प्रस्ताव दिनांक ३० एप्रिल, १९८५ रोजी शासनाकडे मान्यतेसाठी सादर केले होते. तथापि, शासनाच्या नगर विकास विभागाने आपल्या दिनांक २१ एप्रिल, १९८६ च्या पत्र क्र. बीबीआर-१०८५/१९०७/यु. डी. ५ अन्वये मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाला अशी विनंती केली की, नरीमन पॉईंट भागात इंदिरा गांधीच्या पुतळ्यासाठी प्रस्तावित केलेली जागा विचारात घेता वरील योजना पुन्हा तयार करावी आणि सौंदर्य योजने संबंधीचे प्रस्ताव समाविष्ट करून बॅक-बे रेक्लमेशन भागासाठी सुधारीत मसूदा योजना शासनाकडे पाठवावी. तद्नुसार प्राधिकरणासमोर त्यावेळी ठेवलेल्या विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावामध्ये बॅक-बे सौंदर्य वाढ योजनेचे प्रस्ताव समाविष्ट असून ते त्यांचा एक अविभाज्य भाग आहेत. मसूदा विकास योजनेमध्ये, यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करून प्रकाशित केलेल्या विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावाला केलेले फेरबदल/वाढ अंतर्भूत आहे.

त्यानंतर प्राधिकरणाने विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावांवर विचार केला :

१. इंदिरा गांधींच्या पुतळ्यासभोवती बगीचा :

नरिमन पॉईंटजवळ एन. सी. पी. ए. भूखंडाच्या दक्षिणेस सुमारे १.९६ हेक्टर

क्षेत्रफळाची जमीन पुन:प्रापण करून तेथे श्रीमती इंदिरा गांधीचा भव्य आकाराचा पुतळा उभारणे व त्या सभोवती बगीचा करणे या संबंधीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावावर विचार करण्यात येऊन त्याला मान्यता देण्यात आली.

२. भूखंड क्र. १९६ - बेस्ट :

सुरुवातीला हा भूखंड आयकर विभागाला देण्यात आला होता. परंतू नंतर १९७९ मध्ये, शासनाने हा भूखंड आयकर विभागाकडून काढून घेण्याचा निर्णय घेतला व तो बेस्ट उपक्रमाला त्या भागात अत्यंत आवश्यक असलेले बस स्थानक उभारण्यासाठी देण्यात आला याची प्राधिकरणाने दखल घेतली. सदर भूखंड बेस्टसाठी, तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या बसेस ठेवण्यासाठी राखून ठेवण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली.

३. भूखंड क्र. ८६ :

हॉटेल प्रेसीडेन्ट खाजगी प्रयोजनासाठी वापरीत असलेला सदर भूखंड त्यांच्याकडून काढून घेऊन तो बृहन्मुंबई महानगरपालिकेला सार्वजनिक बगीचा म्हणून विकसित करण्यास देण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

४. ब्लॉक क्रमांक तीनमध्ये ज. भोसले मार्ग व नेताजी सुभाष मार्ग यांना जोडणारा ६० फूटी पूर्व-पश्चिम मार्ग बांधणे

हा उपमार्ग मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने केलेल्या वाहतूक पाहणीच्या आधारे प्रस्तावित केला आहे. मुख्यत: कुलाबा [दक्षिण] व कफ परेड या भागातून येणा-या आणि तिकडे जाणा-या तसेच नेताजी सुभाष मार्ग प्रवेश करून पुढे जाणा-या वाहतुकीसाठी पूर्व-पश्चिम अशा जोडमार्गाची तरतूद करण्यासाठी हा रस्ता आखण्यात आला आहे. त्यायोगे बॅक-बे रेक्लमेशनच्या ब्लॉक तीन मधील अंतर्गत रस्त्यांवरील गर्दी कमी होण्यास व मंत्रालयासमोरून जाणा-या मादाम कामा रोडचा वापर कमी होण्यास मदत होईल.

हा उपमार्ग एन. सी. पी. ए. भूखंडाच्या नैऋत्य टोकाशी समाप्त करण्यात यावा या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनेची प्राधिकरणाला माहिती करून देण्यात आली.

प्राधिकरणाला असे वाटले की, सार्वजनिक बांधकाम विभागाची सूचना मान्य केली तर उपमार्ग बांधण्याचा मूळ हेतूच असफल होईल कारण नेताजी सुभाष मार्ग व जगन्नाथ भोसले मार्ग यामधील वाहतूक नाईलाजाने बॅक-बे रेक्लमेशन योजनेच्या ब्लॉक तीन मधील मार्गावरून जाईल व त्यामुळे ब्लॉक तीन मधील रस्त्यांवर याअगोदरच असलेली गर्दी आणखी वाढेल.

....५/-

म्हणून, प्राधिकरणाने, टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे उप मार्गास संमती दिली.

मंत्रालयापासून विधान भवनापर्यंत वाहनांसाठी व पादचा-यांसाठी एका भुयारी मार्गाची तरतूद करण्याची सूचना मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी केली. जर ही सूचना शक्य असल्याचे आढळल्यास तिचा समावेश विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावांमध्ये करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. ही सूचना, अभियांत्रिकी, वाहतूक व नियोजन या दृष्टीकोनातून तपासून पाहण्याचे मान्य करण्यात आले.

विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावांमध्ये समाविष्ट असलेल्या बाकीच्या प्रस्तावांचा खोलवर अभ्यास करण्यासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सदस्यांनी सांगितले. तदनुसार राहीलेल्या प्रस्तावांवरील विचारविमर्श सध्या तरी पुढे ढकलण्यात यावा असे अध्यक्षांनी ठरविले. तथापि असे ठरविण्यात आले की, वरील विषय प्राधिकरणापुढे ठेवलेला असल्यामुळे शासकीय विभागानी नवीन प्रस्ताव/बदल सुचविल्यास ते प्राधिकरणाला यापूर्वीच सादर केलेल्या विकास योजनेच्या मसूदा प्रस्तावांमध्ये समाविष्ट करू नयेत.

<u>बाब क्र. ५</u> : <u>वांद्रे-कुर्ला समूहाच्या "एच" विभागातील भूखंडातील वाणिज्य उपयोगाचे क्षेत्र तेल व नैसर्गिक वायु आयोग व निवासी क्षेत्र महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्यामध्ये विक्री करण्यासंबंधाने प्रस्ताव</u>

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार विनिमय करून खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र. ३४८</u> :

"असा ठराव करण्यात येतो की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम ३च्या पोटकलम [२] अन्वये दिलेल्या शक्तींच्या आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, धारावी बस डेपोच्या लगत वांद्रे-कुर्ला समूहाच्या "एच" ब्लॉकमध्ये असलेला सुमारे २२८५२ चौ. मि. क्षेत्रफळाच्या भूखंडाची खालीलप्रमाणे विक्री करण्यास मान्यता देत आहे :-

१. पंतप्रधानाच्या अनुदान प्रकल्पानुसार धारावीचा फेर विकास करण्याच्या प्रयोजनासाठी या भूखंडाचा निवासी भाग म्हणून सुमारे १२४२७ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला प्रति चटई

क्षेत्र निर्देशांक मीटरला ३००० रु. [तीन हजार रु. फक्त] हा अधिमूल्य दर किंवा नगर रचना संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी निश्चित केलेला दर यापैकी जो दर जास्त असेल त्या दराने विकण्यात यावा.

२. या भूखंडाचा सुमारे १०४२५ चौ. मी. क्षेत्रफळाचा वाणिज्यिक भाग तेल व नैसर्गिक वायू आयोगाला प्रति चटई क्षेत्र निर्देशांक मीटरला रु. ६२५०/- [सहा हजार दोनशे पन्नास रु. फक्त] या अधिमूल्याने विकण्यात यावा.

"त्यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांना या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे.

"त्यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांना सदर भू-खंडाची विक्री करण्याच्या संबंधात दस्तऐवज करून देताना भाडेपट्टयाच्या करारात व विलेखात योग्य ते बदल करण्यास प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

बाब क्र. ६ : पांचपाखाडी [जि. ठाणे] येथे भूखंड मिळावा म्हणून महाडाकपाल [पोष्ट मास्तर जनरल] महाराष्ट्र परिमंडळ, मुंबई-४०० ००१ यांनी केलेली विनंती

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार विनिमय करून खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. ३४९ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम ३ च्या पोट कलम [२] अन्वये दिलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे ठाणे तहसीलामधील पाचपाखाडी येथील सुमारे २००० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड पोष्ट मास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई-४०० ००१ यांना प्रति चटईक्षेत्र निर्देशांक मीटरला ५२५ रु. या अधिमूल्याने विकण्यास संमती देत आहे.

"यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, महानगर आयुक्त यांना या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे.

...७/-

"यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, महानगर आयुक्त यांना याद्वारे वाटपग्राहीबरोबर करावयाच्या भाडेपट्टयाच्या करारात आणि विलेखात आवश्यक त्या योग्य दुरूस्त्या करण्यास प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

<u>बाब क्र. ७ :</u> <u>विश्रामगृहाचे [साइट क्र. ६७] आरक्षण काढून टाकणेबाबत</u>

महाराष्ट्र प्रादेशिक व **नगररचना अधिनियम**
<u>१९६६ यामधील **तरतुदीनुसार अंबरनाथ विकास आराखड्यात** फेरफार</u>

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार विनिमय करून खालील ठराव संमत केला.

<u>ठराव क्र. ३५० :</u>

"ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ४० [एक] [सी] च्या तरतुदीनुसार शासन निर्णय क्र. टीपीबी/१२७५/११९१/युडी-८ दिनांक १५ मार्च १९७६ अन्वये कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] च्या तरतुदीनुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कामे करण्यास नियुक्त केले आहे.

"आणि ज्याअर्थी, पूर्वीच्या कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगर परिषदांचे क्षेत्र आणि उल्हासनगर नगरपालिका हद्दीतील क्षेत्र हे विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट केले आहे.

"आणि ज्याअर्थी कल्याण महानगरपालिकेच्या प्रशासकांनी म.प्रा. व न.रचना अधिनियमाच्या कलम ५० अन्वये अंबरनाथच्या मंजूर विकास योजनेमधील जागा क्र. ६७ वर असलेले विश्राम गृहाचे आरक्षण वगळण्याचा व सदर जमीन निवासी पट्टयामध्ये टाकण्याचा आणि ती जमीन आपल्या दिनांक २४ एप्रिल, १९८७ च्या ठराव क्र. ३७ अन्वये आयुक्त, कल्याण महापालिका यांचे निवासस्थान म्हणून वापरण्याचा ठराव केला आहे.

"आणि ज्याअर्थी, वरील गोष्टीचा सविस्तर विचार करून मुं.म.प्र.वि. प्राधिकरण हे जागा क्र. ६७ वरील आरक्षण वगळण्याच्या व सदर जमीन निवासी पट्टयामध्ये टाकण्याच्या कल्याण महानगर पालिकेच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"त्याअर्थी, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण हे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५०[१][ब] अनुसार अंबरनाथच्या विकास योजनेतील जागा क्र. ६७ चे आरक्षण वगळण्याची आणि ती जमीन निवासी पट्टयामध्ये

...८/-

टाकण्याची शिफारस करण्याचा ठराव करीत आहे.

"यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, उक्त अधिनियमाचे कलम १३९ तसेच मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ७अ अन्वये दिलेल्या शक्तींचा वापर करून हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना या संबंधात राज्य शासनाला योग्य तो निर्देश करण्यास प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ८ : वर्ग-एकच्या अधिका-यांना मूळ वेतनामध्ये तदर्थ वाढ मंजूर करणे

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार करून खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. ३५१ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम ११च्या पोट कलम [२] अन्वये निहीत केलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून हे प्राधिकरण याद्वारे टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे ज्या अधिका-यांच्या वेतनश्रेणी राज्य शासनाच्या वर्ग एकच्या अधिका-यांच्या वेतनश्रेणी समान आहेत अशा प्राधिकरणाच्या अधिका-यांना दिनांक १ ऑक्टोबर, १९८६ पासून मूळ वेतनाच्या २० टक्के तदर्थ वाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करीत आहे.

"यापुढे असाही ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे तदर्थ वाढ देण्यासाठी यापूर्वी केलेली कार्यवाही कायम करीत आहे."

बाब क्र. ९ : लोहमुद्रकांना [फेरो प्रिंटर्स] विशेष आहार भत्ता व मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या अल्पोपहार भत्त्यामध्ये सुधारणा

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार करून खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. ३५२ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे लोहमुद्रकांना कामावर असताना दर दिवशी एक ग्लास दूध व एक कच्चे/उकडलेले अंडे किंवा एक ग्लास दूध व दोन केळी यांचा समावेश असलेला विशेष आहार भत्ता देण्यास आणि मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या अल्पोपहार भत्त्यामध्ये वाढ करण्यास मंजूरी देत आहे."

बाब क्र. १० : १९८६-८७ या वर्षाचे प्राधिकरणाचे वार्षिक लेखे

या बाबीवरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

अध्यक्षांचे आभार मानून झाल्यानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

-------

~~ITEM NO.1~~

# MINUTES OF THE FORTY-FIFTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 4th September, 1987 (Friday).

TIME : 2.00 P.M.

PLACE : Committee Room (4th Floor),
Griha Nirman Bhavan,
Kalanagar, Bandra(East),
Bombay-400 051.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri R.C. Ankleshwaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, C.I.D.C.O., Bombay. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (44th) Meeting of the Authority.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the 43rd and 44th Meeting of the Authority held on 23.3.1987 and 27.4.1987 respectively.

Action
Lands Cell

The Authority noted that the offer of allotment of Plot No.C-19 in 'E' Block of Bandra-Kurla Complex made to the Maharashtra State Electricity Board (MSEB) has not so far been accepted by it in spite of facility of paying the premium in three instalments granted to it. Chairman stated that he would call a meeting of the concerned officers of MSEB and the BMRDA very soon to discuss and resolve the matter.

Item No.3 : .....

**Item No.3 :** Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974 - Certain amendments thereto and continuation of -

During the course of discussion on this item, the following points were brought out :

(1) Referring to the proposal to allow existing office with equal or less area in the reconstructed building in the Island City, it was felt that in the absence of authentic data about existing offices, their exact areas and locations in the Island City, it would be highly difficult to implement this proposal. It was decided to make a suitable reference in this respect to the State Government for necessary action.

Actio[n] Admn. Divis[ion] Unit(

[Ac]tion [A]CP [D]ivn.

As regards the proposal to permit interchange of office and residential user from one location to another within the Island City, the Authority felt that such a step may lead to creation of additional office space in the Island City, since there will be a high probability that existing office spaces will be continued as office spaces even after the particular offices occupying them are shifted to alternative locations.

(2) Referring to para.1 of Annexure-I to the Item Note viz. Government letter in Housing and Special Assistance Department, dated 1.12.1984 regarding grant of accommodation to occupants in new buildings constructed by landlords/ residents of old and dilapidated cessed buildings, it was suggested that instead of giving them area equal to carpet area occupied by them in old buildings they should be given area equal to built-up area. It was decided to refer this suggestion for the State Government's consideration.

Actio[n] Admn. Divisi[on] (Unit-

The Authority then considered the draft Notification appended as Annexure-III to the Item Note and approved the same by passing the following Resolution :

**RESOLUTION NO.347 :**

"Resolved that in partial modification of the earlier orders passed in the matter, the Authority in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf hereby approves of the issue of the draft Notification (Annexure-III) appended to Item Note, as proposed.

Acti[on] Admn. Divn. Unit-

"Resolved.....

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act."

Item No.4 : Draft Development Plan for the area in Blocks III to VI of BBR - Publication of -

While introducing the item, the Metropolitan Commissioner informed the meeting that, with a view to preventing unauthorised reclamation in the Backbay Area as also for arresting the problem of silting, the BMRDA had prepared and published draft proposals for water front development known as "Backbay Beautification Scheme". After following the normal procedure the same was submitted to the Government on 30.4.1985 for approval. However, Government vide its letter in Urban Development Department, No.BBR-1085/1907/UD-5, dated 21.4.1986 requested BMRDA to recast the said scheme in the light of the proposed location of the Indira Gandhi Statue in Nariman Point area and forward Draft Revised Plan for Backbay Reclamation area to Government after incorporating the Beautification Scheme proposals. The Draft Development Plan proposals which are now placed before the Authority accordingly include the Backbay Beautification Scheme proposals also and in fact form an integral part of it. In the Draft Development Plan certain modifications/additions have been made to the Draft Development Plan proposals earlier prepared and published by Municipal Corporation of Greater Bombay.

The Authority then considered the Draft Development Plan proposals :

(1) Garden for Indira Gandhi Statue :

The proposal of the Public Works Department to reclaim an area admeasuring 1.96 hectares on the South of NCPA plot area Nariman Point for erection of a large size statue of Smt. Indira Gandhi with a garden around it was considered and approved.

(2) Plot .....

.....

(2) Plot No.196 - BEST :

The Authority noted that this plot was originally allotted to the Income Tax Department, but subsequently in 1979, Government took a well considered decision to resume the plot from the Income Tax Department and allot the same to the BEST for putting up a critically needed bus station there. The proposal to earmark the plot for BEST as also for parking of MTDC buses was, therefore, approved by the Authority.

(3) Plot No.86 :

The Authority decided that this plot be withdrawn from Hotel President who were using it for private purpose and allow the same to be developed as public garden by Municipal Corporation of Greater Bombay.

(4) 60' wide East-West Road connecting Gen. Bhosale Marg and Netaji Subhash Road in Block-III.

This by-pass road is proposed on the basis of traffic survey conducted by BMRDA. It has been planned principally to provide East-West by-pass for the traffic to and from Colaba (South) and Cuffe Parade and destined to points accessible via Netaji Subhash Road thereby avoiding congested internal road in Block-III of Backbay Reclamation and also to provide badly needed relief to the heavily used Madame Cama Road, passing in front of Mantralaya.

The Authority was also apprised of the suggestion made by Public Works Department to terminate the by-pass near the South-West corner of NCPA plot.

The Authority felt that if the suggestion of the Public Works Department is accepted the very purpose of constructing the by-pass will be defeated because the traffic between Netaji Subhash Road and Jagannath Bhonsale Marg will be forced to enter Block III of the Backbay Reclamation Scheme which will further aggravate the already prevailing traffic congestion on the Block-III roads.

The Authority, therefore, approved the by-pass road as proposed in the Item Note.

The .....

The Chairman, BMRDA made a suggestion to provide underground sub-way both for vehicular and pedestrian traffic, from Mantralaya to the Council Hall. He stated that if found feasible the same be incorporated in the Draft Development Plan proposal. It was agreed to examine this suggestion from engineering, traffic and planning, angles.

Members stated that they would need more time to study in depth the remaining proposals contained in the Draft Development Plan Proposals. Chairman accordingly decided that consideration of the remaining proposals be deferred for the time being. It was, however, decided that since the Authority is already seized of the matter, no new proposals/ changes if suggested by Government Departments, be now incorporated in the Draft Development Plan Proposals already under submission to the Authority.

<u>Item No.5</u> : <u>Disposal of plot in 'H' Block of the Bandra-Kurla Complex to Oil & Natural Gas Commission, and Maharashtra Housing & Area Development Authority.</u>

The Authority considered the Item Note and after discussion, passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.348</u> :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords approval for disposal of plot admeasuring about 22852 square metres situated in 'H' Block of Bandra-Kurla Complex, adjacent to Dharavi Bus Depot, as follows :

(i) The residential component of the plot admeasuring about 12427 square metres to Maharashtra Housing & Area Development Authority for the purpose of Dharavi Re-development under Prime Minister's Grant Project, at the premium of Rs.3,000/- (Rupees Three thousand only) per F.S.I. square metre or at the rate to be determined by the Director of Town Planning, Maharashtra State, whichever is higher.

(ii) The commercial component of the plot admeasuring about 10425 square metres shall be allotted to the Oil & Natural Gas Commission at a premium of Rs.6250/- (Rupees Six thousand two hundred fifty only) per F.S.I. square metre.

"Resolved.....

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA, be and is authorised to take further suitable action for implementation of this Resolution.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA, be and is authorised to effect suitable changes in the agreement to lease and lease deed while executing the documents in respect of disposal of the said plot."

Item No.6 : Request by the Post Master General, Maharashtra Circle, Bombay-400 001 for allotment of land at Panchpakhadi, District Thane.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.349 :

"Resolved that in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority is pleased to allot a plot admeasuring 2000 square metres of land at Panchpakhadi, Tehsil Thane to the Post Master General, Maharashtra Circle, Bombay-400 001, at a premium of Rs.525/- per F.S.I. square metre.

Acti[on] Land Cell

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA be and is hereby authorised to take further suitable action for implementation of this Resolution.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA be and is hereby authorised to make suitable amendments if necessary in the form of Agreement to Lease and Lease Deed to be executed with the allottees."

Item No.7 : Deletion of Reservation of 'Rest House' (Site No.67) Modification to the Development Plan of Ambarnath under MR&TP Act, 1966.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.350 :

Action Admn. Divn. (Unit-I)

"Whereas the BMRDA is appointed as Special Planning Authority (SPA) for Kalyan Complex Notified Area (KCNA) as

Acti[on] T&CP Divn

per .....

per G.R. No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976 under provisions of Section 40(i)(c) of MRTP Act to perform functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of the MRTP Act, 1966;

"And whereas the areas of erstwhile Municipal Councils of Kalyan, Dombivali, Ambernath and Municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of the Special Planning Authority;

"And whereas the Administrator, Kalyan Municipal Corporation has resolved to delete the reservation for Rest House bearing Site No.67 in the sanctioned Development Plan of Ambernath under Section 50 of the MR&TP Act and to include the said land in residential zone and use it as residence of Commissioner, Kalyan Municipal Corporation under its Resolution No.37, dated 24.4.1987;

"And whereas the BMRDA on detailed consideration of the above, agrees with the proposal of Kalyan Municipal Corporation to delete the reservation of Site No.67 and to include the said piece of land in 'R' Zone.

"Now, therefore, the BMRDA resolves to recommend the deletion of reservation of Site No.67 in Development Plan of Ambernath and include the said piece of land in 'R' Zone, under Section 50(1)(b) of MR&TP Act, 1966;

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7A of the BMRDA Act, 1974 authorises the Metropolitan Commissioner to write to the State Government in the matter, suitably."

<u>Item No.8</u> : <u>Grant of ad hoc increase in the Basic Pay to Class-I Officers.</u>

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.351</u> :

"Resolved that in exercise of its powers under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf the Authority hereby approves the proposal to grant the benefit of ad hoc increase of 20% in the Basic Pay with effect from 1.10.1986 to its Officers whose pay scales are analogous with Class-I Officers

of the .....

of the State Government as proposed in the Item Note.

"Resolved further that the Authority hereby ratifies the action already taken to release the payment on account of ad hoc increase."

<u>Item No. 9</u> : <u>Grant of Special Diet Allowance to Ferro Printers and revision of snacks allowance to B.M.R.D.A. employees.</u>

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.352</u> :

"Resolved that the Authority hereby accords sanction to grant of special diet allowance consisting of one glass of milk and one raw/boiled egg or one glass of milk and two bananas per day on duty to the Ferro-Printers, and to the increase in snacks allowance to BMRDA employees as proposed in the Item Note."

Acti
Admn
Divn
(Uni

<u>Item No.10</u> : <u>Annual Accounts of the Authority for the year 1986-87.</u>

Consideration of this item was deferred.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ukd:17987: